www.sgbauonline.com

AU–1972

# B.A. (Part—III) Examination
## (Modern Indian Language)
## MARATHI (Compulsory)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

सूचना:— सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

1. 'वऱ्हाडी लोकभाषेचा इतिहास', वा. ना. देशपांड्यांनी कसा मांडला, ते लिहा.

किंवा

विद्यापीठ निर्मितीमागील म. गांधीजींची भूमिका सविस्तर स्पष्ट करा. 12

2. देश सुजलाम्-सुफलाम् होण्यासाठी काय करावे, असे पंढरीनाथ पाटील यांना वाटते, ते सांगा.

किंवा

विदर्भ राज्याची प्राचीन वैशिष्ट्ये, वि.भि. कोलते यांनी कशी मांडली आहेत, ते लिहा. 8

3. 'म्हातारपणाचे फायदे' या ललितपाठाद्वारे श्री. कृ. कोल्हट करांची विनोद शैली उलगडून दाखवा.

किंवा

'अतिथी देवो भव'' या पाठातील पैकू आणि बायजाचे स्वभावचित्र रेखाटून दाखवा 12

4. बदलत्या कुटुंब व्यवस्थेचे चित्रण 'घर' या कथेतून वासुदेव मुलाटे यांनी कसे केले, ते लिहा.

किंवा

'प्रेम' या निसर्गवर्णन पर ललित उताऱ्याची वैशिष्ट्ये सांगा. 8

5. सावतामाळी आणि कान्होपात्रा यांच्या अभंगांतील मथितार्थ 'संतवाणी' द्वारे उलगडून दाखवा.

किंवा

'जोगिया' कवितेतील विशुद्ध प्रेमाची व्रतस्थ जाणीव स्पष्ट करा. 12

6. 'नदी किनारी' या कवितेतील विविध वैशिष्ट्यांची मांडणी करा.

किंवा

'किल्ली' या कवितेतून अजीम नवाज राही यांनी व्यक्त केलेल्या संवदेना उलगडून दाखवा. 8

7. (अ) म. फुले तंत्रशिक्षण-प्रशिक्षण संस्था, पार्वती रेसिडेन्सी शास्त्रीनगर, यवतमाळ येथे मॅट्रीक उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी बांधकाम, ईलेट्रीकल मेटेनन्स या कोर्स साठी प्रवेश प्रक्रिया सुरु आहे, या आशयाची जाहिरात द्या.

किंवा

श्रीमती सविताबाई देशमुख महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ येथे संत गाडगेबाबा पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला, वर्तमानपत्रातून बातमी द्या. 5



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(ब) खालील उताऱ्यावरील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–

कुठलंही मूल्य हे आंधळेपणाने, केवळ रूढी किंवा परंपरा म्हणून न स्वीकारता, शास्त्रीय कसोटीवर पडताळून पाहून मगच स्वीकारावं, अशा वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना करणारे पालक मुलास नैतिकतेच्या उन्नत पातळीवर पोहचण्यास हातभार लावतात. उदाहरणार्थ, 'चांगलं फळ मिळण्यासाठीच चांगलं वर्तन करावं' असं मूल्य बाळगल्यास, कित्येकदा प्रत्यक्ष जीवनात चांगलं वर्तन करुनही चांगलं फळ न मिळाल्याचं आढळून येतं. मग 'चांगलं वर्तनच न करणं असं मूल्य बाळगावं का ?' असा प्रश्न मूल विचारू शकतं, इथे मुळातच 'कुठलंही वर्तन करताना त्याचं अनुकूल असं विशिष्टच फळ मला मिळालं पाहिजे' हे गृहीत तत्वच चुकीचं व अविवेकी आहे. चांगलं वर्तन हे ते चांगलं आहे म्हणून करणं व सामाजिक नीतीशी सुसंगत आहे म्हणून करणं श्रेयस्कर ठरतं, हे समजावून सांगणं महत्त्वाचं आहे.

(1) मूल्य कसे स्वीकारावे ?

(2) वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना करणारे पालक मुलास का आवश्यक आहेत ?

(3) प्रत्यक्ष जीवनात चांगल्या वर्तनाचे काय झाले असते ?

(4) कोणते गृहीत तत्त्व चुकीचं व अविवेकी आहे ?

(5) कोणते वर्तन करणे श्रेयस्कर असते ?

किंवा

वरील उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश लिहा. 5



www.sgbauonline.com